ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 110-M (NS)**

**Code No. : 110-M (NS)**

# ಡಿ.ಇಡಿ. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ

# D.Ed. FIRST YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( LPS )

# FIRST LANGUAGE — MARATHI

(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)

**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 18. 05. 2019 ]

Date : 18. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास अनकूल व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिलेला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सुचनेप्रमाणे लिहीणे आवश्यक आहे.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य ते उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे. $10 \times 1 = 10$

1. मुलाची घरी बोलली जानारी भाषा ही पुर्णतः ही भाषा असते

   (अ) कन्नड-मराठी मिश्र भाषा (आ) अनौपचारिक भाषा

   (इ) औपचारिक भाषा (ई) औपचारिक आणिक अनौपचारिक भाषा.

2. एखाद्या भाषातज्ञ मराठी भाषेतोल एकत्रित नियमांचा समावेश करून अशी भाषा बनवितो

   (अ) अनौपचारिक भाषा (आ) मिश्र भाषा

   (इ) शुद्ध शास्त्रोय भाषा (ई) प्रादेशिक भाषा.

3. नवीन शब्दांचा अर्थ समजुन घेताना प्रत्येक वेळ शब्दकोश पहाण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी हे केले पाहीजेत

(अ) सांदर्भिक माहितीचा अंदाज घेतला पाहीजेत

(आ) कथा कादंबऱ्या वाचल्या पाहीजेत

(इ) मुलाना सरळ नवीन शब्दांचा अर्थ सांगितला पाहीजेत

(ई) मुलाना वाचन करण्यास लावले पाहीजेत.

4. श्रवणदोष असलेल्या मुलाला

(अ) व्यवस्थित वाचता येत नाही (आ) व्यवस्थित लिहीता येत नाही

(इ) व्यवस्थित ऐकू येत नाही (ई) शिकविलेला भाग समजत नाही.

5. दृष्टीदोष असलेल्या मुलांसाठी हे केले पाहीजेत

I. फलकावरील अक्षर मोठे असावे

II. फलकावरील लेखन लहान असावे

III. चित्रांचे वाक्याद्वारे विवरण करावे

IV. मित्राचे त्याला सहकार्य नसावे.

**यापैकी**

(अ) I आणि II बरोबर (आ) II आणि III बरोबर

(इ) III आणि IV बरोबर (ई) I आणि III बरोबर.

6. खेळामुळे मुलांमध्ये हे भाषा कौशल्य विकसित होते.

(अ) श्रवण कौशल्य (आ) अभिव्यक्ति कौशल्य

(इ) लेखन कौशल्य (ई) वाचन कौशल्य.

7. भाषेचे अस्तित्व टिकून रहाते ते या संदर्भात

(अ) आर्थिक संदर्भात (आ) शैक्षणिक संदर्भात

(इ) सामाजिक संदर्भात (ई) धार्मिक संदभात.

8. विज्ञानाच्या वापरामुळे संपर्काच्या व्यवस्थेत क्रांती घडुन आल्यामुळे आम्ही या समाजाची कल्पना करत आहेत.

(अ) राष्ट्रपातळीवरील समाजाची (आ) राज्यपातळीवरील समाजाची

(इ) जागतिक समाजाची (ई) शिक्षण समृद्ध अशा समाजाची.

9. मंदगतीने अध्ययन करणाऱ्या मुलांना असे शिकविले पाहीजेत.

I. विविध अशी संपन्मूल्ये वापरून

II. वर्गातोल इत्तर मुलांप्रमाणे

III. अमुर्त कल्पनाना अनेक प्रकारची मुर्त उदाहरणे देऊन

IV. शब्दावर जोर देऊन.

**यापैकी**

(अ) I आणि III बरोबर (आ) II आणि III बरोबर

(इ) I आणि IV बरोबर (ई) III आणि IV बरोबर.

10. आम्ही एक वर्गशिक्षक या नात्याने मुलाने वाचन केलेली परिकल्पना समजुन घेतली की नाही हे ओळखण्यास या कृती देऊ शकतो.
    I. वाचन केलेल्या भागावर प्रश्न विचारून उत्तरे घेणे
    II. वाचन केलेल्या पाठाचा सारांश सांगण्यास लावणे
    III. गृहपाठ देणे
    IV. पुन्हा पुन्हा वाचन करून घेणे.

    **यापैकी**

    (अ) I आणि II बरोबर (आ) II आणि III बरोबर
    (इ) III आणि IV बरोबर (ई) IV आणि I बरोबर.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे देऊन. प्रत्येक उत्तर अर्थपुर्ण असे लिहावे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : $5 \times 2 = 10$

11. स्थानिक संपन्मूल्यांची समोक्षा कशी करावी ? स्पष्ट करा.
12. मौखिक संभाषणात खेळाची भूमिका सांगा.
13. वाचन लेखनाचे मूल्यांकन कसे करावे ?
14. सर्वसमावेशक वर्ग कसा असावा ?
15. तुम्ही एक शिक्षक या नात्याने वर्गात मुलाना भाषेच्या अध्ययनाची संधी कशी द्याल ?
16. मुलाच्या घरच्या भाषेतून शाळच्या भाषेत बदल करण्यास शिक्षक या नात्याने तुम्ही कोणते उपक्रम राबवाल ?
17. तुम्ही एक शिक्षक या नात्याने सर्वसमावेशक वर्गातोल मुलांचे मूल्यमापन कसे कराल ? चर्चा करा.
18. घरची भाषा आणि मातृभाषा या अलीकडच्या काळात बदलत आहेत. समर्थन करा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नात 'अ' आणि 'आ' अशी निवड दिलेली आहे. त्यातील कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान **एक** पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : $8 \times 5 = 40$

19. अ) मुलाच्या भाषा विकासासाठीचे विविध उपक्रम सांगा.

    **किंवा**

    आ) खेळ आणि अध्ययन यांचा संबंध स्पष्ट करा.

20. अ) श्रवण आणि भाषण कौशल्यांचा संबंध स्पष्ट करा.

    **किंवा**

    आ) मुल आपल्या स्वभाषेतुन घरच्या भाषेत कसे बदल घडऊन आनते ?

21. अ) मुलाना कथा सांगावयाची असल्यास शिक्षकाने त्याची पूर्व तयारी कशी करावी ? स्पष्ट करा.

    **किंवा**

    आ) एकणे आणि श्रवण यातील फरक स्पष्ट करा.

22. अ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने मुलांच्या लेखनाची पूर्व तयारी कशी करून घ्याल ?

    **किंवा**

    आ) तुम्ही मुलांच्या कडून शुद्ध लेखनाचा सराव कसा करून घ्याल ?

23. अ) मुलाने वर्गात भाषेचे अध्ययन करताना शिक्षकाने कोणते अंश लक्षात ठेवले पाहीजेत ?

**किंवा**

आ) नली-कली वर्ग प्रक्रियेचे कोष्टक तयार करून नली-कली अध्ययनाचे वैशिष्ट्य स्पष्ट करा.

24. अ) मुलाची घरची पार्श्वभूमी जानुन घेऊन त्या मुलाचा वाचन विकास होण्यास तुम्ही कोणते उपक्रम राबवाल ? सविस्तर लिहा.

**किंवा**

आ) मुलाचे समाजात भाषेचे अध्ययन कसे होते ? विवरण करा.

25. अ) सर्वसमावेशक वर्गाची गुण लक्षणे स्पष्ट करा.

**किंवा**

आ) संभाषणात दोष असणाऱ्या आणि दृष्टीदोष असणाऱ्या मुलांसाठी अध्ययनात कसे मार्गदर्शन करावे ? स्पष्ट करा.

26. अ) खालील कवितेचा सारांश लिहा

गे मायभू

गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे :
आणीन आरतीला हे सर्य, चंद्र, तारे.
आई, तझ्यापुढे मी आहे अजून तान्हा;
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा.
आई, तुझ्यापुढे ही माझी व्यथा कशाला ?
जेव्हा तुझ्यामुळे ह्या जन्मास अर्थ आला.
मी पायधूळ घेतो तेव्हा तुझो जराशी,
माझी ललाट रेश बनते प्रयाग काशी
आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी;
माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी !

**किंवा**

आ) खालील कथेचे नाटकात रूपांतर करा.

एक बेडुक उड्या मारत मारत जाऊन विहीरीत पडला होता. प्रयत्न करू नही त्याला विहीरीतून बाहेर येता येत नव्हते. ता मदतीसाठी मोठ-मोठ्याने ओरडत होता. त्या विहीरीजवळून एक ससा जात होता. त्या सशाने बेडकाचे ओरडणे एकले आणि विहीरीत डोकाऊन पाहीले. वेडकाने त्याला बाहेर काढण्यास मदत करण्याची विनंती केली. सशाला एक युक्ति सूचली, बेडकाला बाहेर काढण्यास लांबलचक काठी विहीरीत सोडली पाहिजेत. तर बेडुक त्यावर चढुन बाहेर येईल. त्यासाठी ससा काठी शोधण्यास गेला. पण सशाला काठी सापडेना पुन्हा तो विहीरीकडे गेला. पण तितक्यात बेडुक विहीरीतुन बाहेर आला होता. सशाला आश्चर्य वाटले त्याने बेडकाला बाहेर येण्याचे आश्चर्य विचारले, त्यावर बेडूक म्हणाला "तु माझ्याबरोबर विहीरीत डोकाऊन बोलत होतास तेव्हा विहीरीतील सापाने तुझे प्रतिबिंब पाण्यात पाहीले आणि त्यावर झडप घालण्यास त्या सापाने मोठी उसाळी मारली तेव्हा मी घाबरून सर्व ताकत एकवटुन उंच अशी उडी मारली आणि विहीरीबाहेर आलो.